# जाहीर सुचना

महावितरण संवसु मंडळ, गडचिरोली अंतर्गत गडचिरोली/ब्रम्हपुरी/आलापल्ली विभागाच्या आस्थापनेवर एक वर्ष (2025-2026) कालावधी करिता वीजतंत्री/ तारतंत्री व कोपा (COPA) व्यवसायासाठी शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यासाठी **दिनांक 01.09.2025 ते दि. 10.09.2025 पर्यंत 6.15 वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.org** या संकेतस्थळावरिल खालील नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नाव | आस्थापना क्रमांक | व्यवसाय | | | एकुण जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विजतंत्री | तारतंत्री | कोपा | |
| 1 | गडचिरोली विभाग | E-04172700335 | 21 | 16 | 07 | 44 |
| 2 | ब्रम्हपूरी विभाग | E-05202702239 | 18 | 13 | 04 | 35 |
| 3 | आलापल्ली विभाग | E-04172700056 | 15 | 11 | 02 | 28 |

**सदर भरतीमध्ये गडचिरोली जिल्ह्यासह गडचिरोली मंडळाच्या कार्यक्षेत्रातील ब्रम्हपुरी, नागभिड व सिंदेवाही या तालुक्यातील रहीवासी असलेल्या उमेदवारास प्राधान्य राहील.**

**1. शैक्षणिक अर्हता :** महाराष्ट्र राज्य शालांत परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तिर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री/ तारतंत्री व कोपा या व्यवसायात उत्तिर्ण असणे आवश्यक आहे. **2. वयोमर्यादा :- दिनांक 15.09.2025** रोजी किमान वय 18 वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. मागासवर्गीयासाठी 05 वर्ष शिथीलक्षम **3. विद्यावेतन :-** शासकीय नियमाप्रमाणे देय राहील. **4.** शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थपनाकडे राखीव असतील व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. **5.** एस. एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रीका व प्रमाणपत्राची प्रत आधारकार्डच्या नावाशी सुसंग असलेली माहिती भरावी. **6. आय. टी. आय. उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत (चार सेमिस्टर गुणपत्रिका) जोडण्यात यावी. 7.** उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास जात प्रमाणपत्र साक्षांकीत केलेली छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. **8.** भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास उमेदवारी अर्ज रद्द करण्यात येइल. **9.** उमेदवाराचे ऑनलाईन व्यतिरिक्त इतर माध्यमांतुन आलेले अर्ज स्विकारले जाणार नाही. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितिने अपलोड करणे आवश्यक आहे. **10.** वरिल प्रमाणे नमुद कालावधीत अर्ज सादर न केल्यास त्यानंतरच्या व पुर्वीच्या तारखेस सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. **11.** ऑनलाईन अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेला स्वतःचा Email Id व Mobile No. नोंदवीणे आवश्यक राहील. **12.** उमेदवाराची निवड ही आय. टी. आय. मधील प्राप्त गुणपत्रिकेच्या गुणवत्तेनुसार (Merit List) करण्यात येईल. **13. उमेदवाराने कोणत्याही एकाच विभागासाठी ऑनलाईन अर्ज सादर करावा एकापेक्षा जास्त विभागामध्ये अर्ज सादर केल्यास अर्ज रद्द कण्यात येईल. तसेच याबाबत उमेदवारास कळविले जाणार नाही. 14.** उमेदवाराने सादर केलेल्या ऑनलाईन अर्जानुसार उमेदवाराची विभागनिहाय निवड यादी कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसारित करण्यात येईल.

**अधिक्षक अभियंता**

**पी. आर. ओ. क्र. 75 दि. 13.08.2025** — **संवसु प्रविभाग, म.रा.वि.वि.कं.मर्या., गडचिरोली**

Mahabharti.in